दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता


vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शनिवार दि.२४ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Saturday 24 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 151 • Pages 4 • Rate 4 Rs




# होळ सर्कल मतदारसंघातून प्रा.रेखा भांगे रणांगणात उतरणार

## शिक्षण, संवेदना व सर्वांगीण विकासाची नवी दिशा-जनतेतून जोरदार मागणी

केज (प्रतिनिधी)–आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केज तालुक्यातील होळ सर्कल हा अनुसूचित जाती महिला राखीव मतदारसंघ घोषित झाल्यानंतर, या मतदारसंघातून उच्चशिक्षित, अभ्यासू व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या प्रा. रेखा भांगे (सरवदे) निवडणूक रणांगणात उतरणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या उमेदवारीसाठी केवळ राजकीय वर्तुळातूनच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक, शेतकरी व विविध सामाजिक घटकांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे.



### शिक्षणातून नेतृत्वाकडे वाटचाल

शिक्षण क्षेत्रात दीर्घ अनुभव असलेल्या प्रा. रेखा भांगे या सामाजिक प्रश्नांची सखोल जाण असलेल्या व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात. विद्यार्थ्यांचे प्रश्न, महिलांच्या समस्या, ग्रामीण भागातील मूलभूत अडचणी यावर त्यांनी नेहमीच अभ्यासपूर्ण भूमिका घेतली आहे. त्यांच्या स्पष्ट विचारसरणीमुळे आणि प्रामाणिक कार्यशैलीमुळे त्या होळ सर्कल मधील विश्वासार्ह नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत.

### बदलाची चाहूल

प्रा. रेखा भांगे रणांगणात उतरणार असल्याच्या चर्चेमुळे होळ सर्कलमध्ये राजकीय वातावरण तापू लागले आहे. पारंपरिक राजकारणापेक्षा अभ्यासू, लोकाभिमुख आणि संवेदनशील नेतृत्व मिळावे, अशी अपेक्षा मतदार व्यक्त करीत आहेत. त्यांच्या अंतिम घोषणेकडे आणि आगामी दौऱ्याकडे संपूर्ण केज तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### अनुसूचित जाती महिला मतदारसंघात सक्षम पर्याय

अनुसूचित जाती महिला राखीव मतदारसंघात शिक्षित, सक्षम आणि निर्णयक्षम महिला प्रतिनिधी मिळावी, अशी अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत होती. प्रा.रेखा भांगे रणांगणात उतरणार असल्याने विशेषतः महिलावर्गात नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. महिलांचे प्रश्न केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे नेतृत्व मिळेल,अशी भावना व्यक्त होत आहे.

### होळ सर्कलचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास

आपल्या भूमिकेबाबत बोलताना प्रा. रेखा भांगे म्हणाल्या,होळ सर्कलचा सर्वांगीण विकास हेच माझे अंतिम ध्येय आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार व महिलांचे सक्षमीकरण या पंचसूत्रीवर विकासाची दिशा ठरवली जाईल. पद हे सत्तेसाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी असावे, याच भावनेतून मी रणांगणात उतरणार आहे.



### होळ सर्कलचा सखोल दौरा

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रा. रेखा भांगे होळ सर्कलमधील प्रत्येक गाव, वाडी–वस्तीचा दौरा करणार असून या दौऱ्यात त्या शेतकरी व शेतमजुरांच्या समस्या,कामगारांचे रोजगारविषयक प्रश्न,विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न,महिलांचे आरोग्य, सुरक्षितता व स्वावलंबन,पाणी, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा यांचा थेट संवादातून आढावा घेणार आहेत.


# कोंडाईबारी घाटात थरार! ब्रेक फेल झालेल्या ट्रकची दोन वाहनांना धडक;भीषण अपघातातून चालक थोडक्यात बचावला

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

धुळे–सुरत राष्ट्रीय महामार्गावरील मृत्यूचा सापळा मानल्या जाणाऱ्या कोंडाईबारी घाटात आज पुन्हा एकदा भीषण अपघाताची घटना घडली. तीव्र उतारावर एका ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने या ट्रकने उभ्या असलेल्या ट्रकला आणि एका चालत्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. या विचित्र अपघातात लातूरचे एक प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने मोठी जीवितहानी टळली आहे.

दुपारी ११ वाजेच्या सुमारास साखर घेऊन जाणारा ट्रक (क्रमांक घ- ३९ - ०१९९) कोंडाईबारी घाटातून उतरत होता. घाटातील तीव्र उतारावर अचानक या ट्रकचे ब्रेक फेल झाले. ट्रकचा वेग प्रचंड असल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले. दरम्यान, हा अनियंत्रित ट्रक प्रथम रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या तांदळाने भरलेल्या ट्रकवर (क्रमांक GJ 12 BV 6253) जाऊन आदळला. ही धडक इतकी भीषण होती की तांदळाचा ट्रक जागीच पलटी झाला.



एवढ्यावरच न थांबता, साखर घेऊन जाणाऱ्या या ट्रकने पुढे मशिनरी घेऊन जात असलेल्या ट्रेलरलाही (क्रमांक 44 AG 4667) पाठीमागून जोरदार धडक दिली.या भीषण अपघातात साधू सूर्यवंशी (राहणार लातूर) हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच राष्ट्रीय महामार्गाच्या १०३३ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी सूर्यवंशी यांना तातडीने विसरवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

**वाहतूक विस्कळीत**

एकापाठोपाठ एक तीन वाहने एकमेकांना धडकल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# दुनगांव येथे बाल आनंद नगरी सोहळा मोठया उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**पाचोड | प्रतिनिधी**

दि.२१ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दुनगांव येथे बाल आनंद नगरी हा कार्यक्रम घेण्यात आला या कार्य क्रमाला शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. बंडु बांगर सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख श्री. लक्ष्मण पांगरकर सर होते. मान्यवराच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. शाळेच्या वतीने मान्यवर पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री मुजीब पटेल यांच्या हस्ते बाल आनंद मेळाव्याच्या फलकाची फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमा गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री बबन



मंडलिक उपसरपंच, बबन जायभाये, अशोक साबळे, जितेंद्र शेळके, प्रभाकर पाटोळे, दिनकर जायभाये, अफसर खान, संपत जायभाये श्री. पांडुरंग जायभाये, शेषेराव डेरे, भीमराव भिंगारे, पिंटू जायभाये, सुभाष जायभाये आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. चेतन गदळे सर यांनी मांडलेप्रास्तविकात सरांनी बाल आनंद मेळाव्याचे महत्त्व सर्वांना सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सोनवणे सर यांनी केले तर मान्यवराचे आभार श्री. भवर सर यांनी मांडले. या कार्यक्रसाठी भिसे मॅडम, श्री. काकडे सर,गिराम मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वादळी कट्टा

फॉर्म हातात, आशा मनात, पहिलीच फेरी झाली,
खिडकी बंद, साहेब बाहेर–दुसरी लगेच आली.
चहा, सही, आणि शिक्का यांचा खेळ जुना,
फेऱ्यांतच नागरिकाचं आयुष्य झिजुना.

फाइल पुढे, सही मागे, वेळ मात्र थांबलेली,
आज ये उद्या ये म्हणत तारीखच थकलेली.
कामाचं काम कधी होईल, प्रश्न अनुत्तरित,
कार्यालयात फेऱ्या मारत नागरिकच अपराधी ठरवित.

खुर्चीवर साहेब बसले, भिंतीवर घड्याळ झोपलं,
अर्जाचं काय झालं विचारताच तोंड वाकडं झालं.
काम नसे तरी सही हवी, नियमांचा धुमाकूळ,
फेरी फेरी फिरताना नागरिक होतो मूकबधिर गूळ.

खुर्चीवर अधिकार बसला, दारात उभा प्रश्न,
अर्जाला तारखा वाढतात, उत्तर मात्र शून्य.
फेरीवर फेरी घालता संपतं आयुष्य सगळं,
साहेबांच्या सहीसाठी नागरिक होतो दररोजचा खेळणं.

संपादक
अजय भांगे



# जिल्हा रुग्णालयात वयोवृद्ध आजारी रुग्णाच्या नातेवाईकास उर्मट पणाची वागणूक देत चक्क सोनोग्राफी सेंटरचे परिचारिकेने दार लावले

## परिचारिकेच्या मनमानी कारभारामुळे रुग्णांच्या नातेवाईकामध्ये संतापाचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या वयोवृद्ध आजारी रुग्णाला उर्मटपणाची भाषा वापरत नीच दर्जाची वागणूक देत चक्क सोनोग्राफी सेंटरचे दार लावून गेल्याचा प्रकार समोर आला आहे. याचा व्हिडीओही समाज माध्यमावर व्हायरल झाला असून या प्रकारावर संताप व्यक्त केला जात आहे. जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी अगोदरच वेळा पाळत नसल्यामुळे रुग्णांमध्ये संताप आहे. त्यातच बुधवारी घडलेल्या प्रकारामुळे जिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना माणुसकी आहे का???असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी होते आहे.

सोनोग्राफी करण्यासाठी गेलेल्या वयोवृद्ध पेशंट आजी तिसऱ्या मजल्यावर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना डॉक्टरांनी सोनोग्राफी करण्यास सांगितले. जिल्हा रुग्णालयातील लिफ्ट बंद असल्यामुळे तिसऱ्या मजल्यावरून काही नातेवाईक व सामाजिक कार्यकर्त्यांनी त्यांना उचलून खाली आणले.

**सेंटरचा दरवाजा बंद करून कर्मचारी गेले**

त्या वयोवृद्ध आजी सहा वाजण्यापूर्वीच सोनोग्राफी सेंटरसमोर आल्या. मात्र, सोनोग्राफी सेंटर मधील महिला कर्मचाऱ्याने पावणे सहा वाजताच दरवाजा बंद केला. समोर ती वयोवृद्ध महिला खाली झोपली असतानाही तिच्याकडे लक्ष न देता सोनोग्राफीचा दरवाजा बंद केला गेला. त्यावर जाब विचारला असता त्या कर्मचाऱ्याकडून आजीच्या नातेवाईकांशी उर्मटपणाची भाषा अपमानित करण्यात आले. समोर आजी असतानाही दरवाजा बंद करून ती महिला निघून गेली. या घटनेचा व्हिडीओ चांगलाच व्हायरल होत असून त्यामुळे बीड जिल्हा रुग्णालयातील कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्रकरणात आपण चौकशी केली असून कर्तव्यात कसूर करणाऱ्या परिचारिकेसह डॉक्टरची चौकशी करून कारवाई केली जाईल अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके यांनी दिली.



# अपेक्षित लक्ष्य भेदण्या साठी आपल्याकडे स्वयं शिस्तीचा बाण आवश्यक-रणजीत आडसकर

## शारदा इंग्लिश स्कूल केज येथे स्वयंशासन दिन व इयत्ता दहावीच्या मुलांना निरोप समारंभ संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

शारदा इंग्लिश स्कूल केज येथे दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी इयत्ता दहावी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ व स्वयंशासन दिनाचे संयुक्तरीत्या आयोजन करण्यात आले होते.सदरील दोन्ही कार्यक्रम अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडले.स्वयंशासन दिनानिमित्त शाळेची सर्व सूत्रे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी यांनी आपल्या हातात घेतले होते.विद्यार्थ्यांमधून शाळेचे मुख्याध्यापक म्हणून याची निवड झाली तर सर्व शिक्षक व इतर स्थानी वेगवेगळ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.दिवसभर वेळापत्रकाप्रमाणे विद्यार्थी,विद्यार्थिनींनी कामकाज पाहिले व अध्यापन केले. विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका देऊन त्यांना शाळेच्या कामकाजाचा अनुभव देणे,नेतृत्व गुण विकसित करणे, जबाबदारीची जाणीव करून देणे हा यामागचा प्रामुख्याने उद्देश समोर ठेवण्यात आला होता.

दुपारच्या सत्रात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाची आखणी करण्यात आली होती.सदरील कार्यक्रम युवा नेते तथा शाळेचे मार्गदर्शक रणजीत आडसकर यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.या प्रसंगी कार्यक्रमाचेअध्यक्ष प्राचार्य डॉ.सोनल महेंद्र मिश्रा होते तर व्यासपीठा वर उपप्राचार्य श्री.सुरज सनी,पी.एम.देशमुख याचीप्रामुख्याने उपस्थिती होती.याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या शाळेमुळेच आम्ही घडलो असे सांगताना अनेकजण भावविभोर झालेले पहावयास मिळाले. यानंतर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले रणजीत आडसकर यांनी सांगितले की,प्रत्येकाला आयुष्यात एक ध्येय किंवा लक्ष गाठवायचे असते. प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी इच्छित लक्ष प्राप्त करण्यासाठी स्वयं शिस्तीत राहणे गरजेचे आहे.इच्छित



लक्ष भेदावयाचे असेल तर स्वयंशिस्तीचा बाण आपल्याकडे असला पाहिजे असे विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.याच बरोबर गुरुजनांचा आदर करा,थोरा मोठ्यांचा सन्मान करा,नम्रतेचा गुण ठेवा असे त्यांनी सांगितले

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सोनल महेंद्र मिश्रा यांनी शाळेच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थी अतिशय गुणी असल्याचे सांगताना जीवनात संघर्ष अटळ असल्याचे त्यांनी सांगितले.काही कालावधीचा संघर्ष जीवनात सुखाची पहाट आणल्याशिवाय राहत नाही असे विद्यार्थ्यांना संदेश दिला.त्यासाठी योग्य ज्ञान मिळवा, कामात सातत्य ठेवा, चुकांमधून शिका असे सांगितले.उपप्राचार्य सुरज सनी यांनीमार्गदर्शन करताना केरळ राज्याचे उदाहरण दिले देशातील शंभर टक्के साक्षर असलेले राज्य केरळ असून हे सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीमुळे कसे शक्य झाले सउदाहरण सांगितले.याप्रसंगी इयत्ता आठवी नववी व दहावी या वर्गाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.अतिशय बहारदार सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थिनीकुमारी आनंदी खोडसे,किमया यादव,पियुषा देशमुख, श्रुती पटाईत यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप शाळेच्या वतीने प्रदीप शेटे यांनी केला.

## कन्हेरवाडी येथील सेवा सहकारी सोसायटीचे माजी व्हाईस चेअरमन नाथराव फड यांचे निधन संतोष फड यांना पितृशोक

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

-परळी तालुक्यातील मौजे कन्हेरवाडी येथील सेवा सहकारी सोसायटीचे माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड यांचे आज दि.२१ जानेवारी २०२५ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. माजी व्हाईस चेअरमन नाथराव फड यांचे सकाळी ०८ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली मृत्यू समयी ६२ वर्षे होते. संतोष नाथराव फड व बबलू नाथराव फड यांचे वडिल होत.

परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड यांचे आज अल्पशा आजाराने बुधवार दि. २१ जानेवारी रोजी निधन झाले. कन्हेरवाडी येथे अनेक काळ सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य व अनेक पद ही त्यांनी भुषविले आहे. याकाळात गावात त्यांनी शैक्षणीक,



सांस्कृतिक अनेक कामात त्यांचा सहभाग होता.

माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड हे अत्यंत मनमिळावू व धार्मिक स्वभावाचे होते. त्यांच्या जाण्याने परळी वैजनाथ तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड यांच्या पाश्चात्य पत्नी, दोन मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड यांच्या पार्थिवावर कन्हेरवाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या या अंतयात्रेत सर्व स्तरातील नागरिक, राजकीय, व्यापारी, पत्रकार, वकील, शिक्षक, प्राध्यापक, पोलीस कर्मचारी व नातेवाईक मोठया प्रमाणात उपस्थित होते. माजी व्हाईस चेअरमन नाथराव श्रीरंग फड यांच्यावर कोसळलेल्या दुःखात दै. लोकनेता परिवार सहभागी आहे.

राख सावडण्याचा कार्यक्रम राख सावडण्याचा विधी शुक्रवार, दि.२३ रोजी सकाळी ७ वा. कन्हेरवाडी येथे शोकाकुल वातावरणात सम्पन्न झाला..

## स्वच्छता उपक्रमातून जनजागृती एनएसएस स्वयंसेवकांचा पुढाकार

**दैनिक वादळ वार्ता**
**पाचोड । प्रतिनिधी**

दिनांक २२जानेवारी २०२६ रोजी, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आरोग्य उपकेंद्र, जळगाव येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.या उपक्रमाचे मार्गदर्शन कार्यक्रमाधिकारी प्रा. विकास बेळगे, डॉ. चंद्रकांत जोगदंड व डॉ. अजय बडे यांनी केले.या अभियानामध्ये आय.वाय.पी कला महाविद्यालय, विहामाडवा यांच्या एनएसएस स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. मोठ्या संख्येने उपस्थित स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता, स्वच्छतेचे महत्त्व आणि आरोग्य-जागरूकता याबाबत जागृती केली.

या उपक्रमावेळी आरोग्यवर्धिनी उपकेंद्राचे डॉ. धनंजय मिसाळ व कर्मचारी विशेष उपस्थित



होते. डॉ. मिसाळ यांनी या प्रसंगी स्वच्छता, रोग प्रतिबंधक उपाययोजना आणि ग्रामस्तरावरील आरोग्य व्यवस्थेत एनएसएस स्वयंसेवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगत मार्गदर्शन केले.

या स्वच्छता अभियानामुळे गावकऱ्यांमध्ये स्वच्छता व आरोग्यासंबंधित सकारात्मक संदेश पोहोचला.

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा आधारे
अर्जदाराचे नाव :- परमेश्वर नारायण वळसे रा.केज यांना श्री. सात बारा सर्वे.न.१७४ यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
घर नंबर----सर्वे.न.१७४
वार्ड क्रं ---- विभाग----
चतु:सिमा
पुर्व : अक्षय सुरवसे
पश्चिम: सुरेश वळसे
दक्षिण : रस्ता
उत्तर : माझी शिल्लक जमीन
लांबी : पु.प. ३३ फूट रुंदी : द.उ. ३३ फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र ५३३६ दि. १३/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा अधारे व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- संदेश लिंबाजी नाईकवाडे
रा.केज यांना श्री. सात बारा सर्वे.न.२०८ यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.२०८
वार्ड क्रं---- विभाग नाईकवाडे वस्ती
चतु:सिमा
पुर्व :स्वतः
पश्चिम:रस्ता
दक्षिण :प्रवीण बालासाहेब नाईकवाडे
उत्तर :स्वतः
लांबी : पु.प. ३० फूट रुंदी : द.उ. ४० फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र १८३०८ दि. ६/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा अधारे व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- रंजना धनराज लोंढे यांना श्री. सात बारा सर्वे.न.४९८ यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.२०८
वार्ड क्रं .१४ विभाग.बोबडे वाडी रस्ता
चतु:सिमा
पुर्व :रस्ता
पश्चिम:शिल्लक जागा
दक्षिण :मनीषा लोंढे
उत्तर :नंदकुमार गुंड
लांबी : पु.प. ३३ फूट रुंदी : द.उ. ३३ फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र ५२२१ दि. १२/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा अधारे व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- संजय नवनाथ नेहरकर रा.केज यांना श्री. सात बारा सर्वे.न.२१२/२ यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.२१२/२
वार्ड क्रं .२ विभाग.धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व :माझी शिल्लक जागा
पश्चिम:जयश्री नेहरकर
दक्षिण :लाईट सप्टेशन ऐरिया
उत्तर :माझी शिल्लक जागा व रस्ता
लांबी : पु.प. ३० फूट रुंदी : द.उ. ४० फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र १९३१५ दि. २०/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा आधारे
अर्जदाराचे नाव :- मेघराज लक्ष्मण गुंड रा.केज यांना श्री.सात बारा स.न. ४९१/आ यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न. ४९१ / आ
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं---- विभाग- गुंड वस्ती
चतु:सिमा
पुर्व : चंद्रकांत गुंड
पश्चिम :अमोल गुंड
दक्षिण : महादेव साहेबराव गुंड
उत्तर : कविराज गुंड
लांबी : पू.प. ३३ फूट रुंदी : द.उ. ३३ फूट
सात बारा स.न. ४९१/आ व अर्ज दि.३०/ १२/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी. व शपथपत्र क्र. ५३४७ दि १९/०१/२०२६

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## अभियोक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड.गोपछडे तर उपाध्यक्षपदी ॲड.बादावाड

**दैनिक वादळ वार्ता**
**मुखेड । प्रतिनिधी**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय,मुखेड येथील अभियोक्ता संघाची २०२६-२०२७ साठीची कार्यकारणी गठीत करण्यात आली असून यावेळी अभियोक्ता संघाच्या अध्यक्षपदी ड.साईनाथ गोपछडे यांची तर उपाध्यक्षपदीड.शंकर बादावाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.मुखेड अभियोक्ता संघाच्या मागील कार्यकारणीचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे नुतन कार्यकारणीचे गठण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत निवडणूक अधिकारी ॲड.एस.एस.गायकवाड यांच्या सुचनेनुसार सदर निवडणूक कार्यक्रम पार पडला असून अभियोक्ता संघाच्या अध्यक्षपदी ॲड.साईनाथ गोपछडे, उपाध्यक्षपदी ॲड.शंकर बादावाड, सचिवपदी ॲड.राहुल मोरे यांची तर सहसचिवपदी ॲड.माधव मरकंटवाड, कोषाध्यक्षपदी ॲड.बाबाराव वाघमारे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली असून सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- पुष्पा हनुमंत तांबारे रा.केज यांना श्री. मीराबाई सुरेश जाधव रा. शेलगाव गांजी यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.१०३/ अ
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं १ विभाग-कानडी रोड
चतु:सिमा
पुर्व : प्रकाश दत्तु जाधव
पश्चिम : १५ फूटाचा रस्ता
दक्षिण : संतोष डिंगाबर काळे
उत्तर : महादेव सखाराम राऊत
लांबी : पू.प.द. बाजु ५० फूट
उ.बाजू ५३ फूट
रुंदी : द.उ.२० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.१४० दि.१२/०१/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव - शिवाजी आबासाहेब ठोबरे रा. उंदरी यांना श्री. मोईन अबुल हमीद खुरेशी
रा. अंबाजोगाई यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न. २२८/२
खुला प्लॉट नं.४
वार्ड क्रं--- विभाग- अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : प्लॉट न.५ राजकुमार राऊत
पश्चिम : प्लॉट नं. ३
दक्षिण : प्लॉट नं. २७
उत्तर : केज- अंबाजोगाई राज्य रस्ता
लांबी : द.उ. १०० फूट
रुंदी : पू.प. २५ फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. ४३५ दि. ०८/०२/२०२१ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
संमतीपत्र / वाटणीपत्रा अधारे वेगवेगळा P.T.R बाबत
अर्जदाराचे नाव :- हनुमंत जिजाराम बोर्डे रा.केज यांचे कडुन खालील
चतु :सिमेच्या आतील
घर नंबर ४३६८ पैकी
वार्ड क्रं-----विभाग-अंबाजोगाई रोड
भाग नं.१ पू.प १८ फूट द.उ.४५
भाग नं.२ पू.प.३६ एकच द.उ.४२.५ फूट
चतु:सिमा
पुर्व : बालासाहेब जिजाराम बोर्डे व सार्वजनिक रस्ता
पश्चिम : सखाराम जिजाराम बोर्डे आणि सुरेश ज्ञानोबा थोरात
दक्षिण : दोघांची समाईक खुली जागा व सखाराम जिजाराम बोर्डे
उत्तर : बीड अंबाजोगाई रस्ता
सम्मतीपत्र व वाटणीपत्र दस्तऐवज नं. ७९४७ दि.७/१/२०२६ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
संमतीपत्र / वाटणीपत्रा अधारे वेगवेगळा P.T.R बाबत
अर्जदाराचे नाव:- सखाराम जिजाराम बोर्डे रा.केज खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर ४३६८ पैकी स.न. २१६/२/२३
वार्ड क्रं-----विभाग-अंबाजोगाई रोड
भाग नं.१ पू.प १८ फूट द.उ.४५ फूट
भाग नं.२ पू.प.३६ फूट द.उ. ४२.५ फूट
चर्तु:सिमा
पुर्व : हनुमंत जिजाराम बोर्डे
पश्चिम : सुरेश ज्ञानोबा थोरात
दक्षिण : हनुमंत जिजाराम बोर्डे
उत्तर : बीड अंबाजोगाई रोड
पुर्व : अजिक्य अशोक साखरे व इतर
पश्चिम : सुरेश ज्ञानोबा थोरात
दक्षिण : सुरेश ज्ञानोबा थोरात
उत्तर :समाईक खुली जागा व हनुमंत बोर्डे
सम्मतीपत्र व वाटणीपत्र नं. ७९४७ दि.७/१/२०२६ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा आधारे
अर्जदाराचे नाव :- कविराज लक्ष्मण गुंड रा.केज यांना श्री. सात बारा स.न.४९१/आ यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न. ४९१ / आ
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं---- विभाग- गुंड वस्ती
चर्तु:सिमा
पुर्व : चंद्रकांत गुंड
पश्चिम :अमोल गुंड
दक्षिण-मेघराज गुंड व १० फूट समाईक रस्ता
उत्तर : शिल्लक जमीन व धनराज गुंड
लांबी : पू.प. ३३ फूट रुंदी : द.उ. ३३ फूट
सात बारा स.न. ४९१/आ व अर्ज दि.३०/ १२/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी. व शपथपत्र क्र. ५३४६ दि. १९/०१/२०२६

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव - दादासाहेब शिवाजी गुंड रा.केज यांना श्री. सात बारा स.न. ३९१/१ यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.३९१/१
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं १६ विभाग- गुंड वस्ती
चतु:सिमा
पुर्व : लक्ष्मण गुंड
पश्चिम :रमेश शिवाजी गुंड
दक्षिण : देविदास गुंड
उत्तर : रस्ता
लांबी : द.उ. ४० फूट रुंदी : पू.प. ३० फूट
सात बारा स.न. ३९१/१ शपथपत्र ९७५९ अर्ज दि.१५/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

# कै.श्री.सोमनाथ शंकरराव भोस्कर (दादा) यांच्या गोड जेवणानिमित्त कीर्तन सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

कै. श्री. सोमनाथ शंकरराव भोसकर यांच्या गोड जेवण कार्यक्रमानिमित्त माघ शुद्ध पंचमी, शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते ०१. या वेळेत भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनसेवेचे आयोजन ह.भ.प. गुरुवर्य श्री. लक्ष्मीकांत महाराज लोहेकर (श्री दत्त मंदिर संस्थान, देऊळगल्ली, लोहा) यांच्या हरिकिर्तनाने करण्यात आले.या प्रसंगी माजी आमदार रोहिदास चव्हाण साहेब, हरिभक्त परायण वामन महाराज, तसेच परिसरातील असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळकरी, मृदंगाचार्य, विणेकरी यांच्या संगतीने कीर्तनात भक्तीरसाचा ओघ अखंड वाहत होता.

कीर्तनातून मार्गदर्शन करताना लक्ष्मीकांत महाराज म्हणाले, मनुष्याने आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण परमात्म्याच्या स्मरणात घालवावा. क्षण गेला तर विद्या जाते आणि कण गेला तर धन जाते.

महाराजांनी रत्नपारख्याचे अत्यंत प्रभावी उदाहरण देत मानवी जीवनातील मूल्य आणि परमात्म्याची ओळख याचे महत्त्व स्पष्ट केले. एका चमकणाऱ्या वस्तूला बाई, सोनार, सराफ यांनी किंमत न ओळखता फेकून दिले; मात्र रत्नपारख्याने ओळख असूनही तिला फेकले, तेव्हा त्या हिऱ्याला दुःख झाले–ज्याला माझी किंमत कळते, त्यानेच मला नाकारले–या उदाहरणातून जाणकारानेही जर ईश्वराकडे दुर्लक्ष केले तर त्याचे दुःख अधिक असते, हा संदेश महाराजांनी दिला.कै. सोमनाथ भोसकर (दादा) यांच्या जीवनकार्याचा उल्लेख करताना महाराज म्हणाले की, आई-वडिलांचे छत्र हरपले की जीवन पोरके होते. वडील म्हणजे आधाराचे छत्र आणि आई म्हणजे मायेची सावली असते. आई गेल्यावर माहेर संपते आणि बाप गेल्यावर आधार हरपतो. दादांनी हसत-हसत आपले संपूर्ण जीवन कुटुंब, समाज आणि सांप्रदायिक कार्यासाठी अर्पण केले. संसार सांभाळत त्यांनी परमार्थाचा मार्ग अखंड चालू ठेवला.या वेळी महाराजांनी भगवंताजवळ प्रार्थना केली की, दादांनी पुन्हा याच घरात जन्म घ्यावा आणि आम्हाला पुन्हा त्यांच्या दर्शनाचा योग मिळावा.

दादांचे जीवन कर्तृत्वाने तृप्त झाले असून त्यांनी सांप्रदायिक आणि सामाजिक जीवनात अमूल्य योगदान दिल्याचेही त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास भोस्कर कुटुंबीय, नातेवाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी संत महात्म्यांनी सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिभाव, श्रद्धा आणि स्मृतींच्या वातावरणात पार पडला.

किर्तनानंतर उपस्थित भाविकांनी महाप्रसाद (भोजन) आस्वाद घेतला. सर्वसामान्य व्यापारी असतानाही वारी-वारकरी संप्रदायाशी नाळ जुळवून, कोणालाही न दुखावता, सर्वांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून सोमनाथ सावकार भोस्कर अर्थात दादा सर्वपरिचित होते. त्यांच्या साध्या, सरळ आणि सेवाभावी स्वभावामुळे ते समाजातील सर्व स्तरांमध्ये लोकप्रिय होते. अशा या गुणी व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणार्थ पार पडलेला हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनात कायमचा ठसा उमटवून गेला.




# आज वाळकेवाडी येथे भव्य सत्संग व पालखी सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**



लोहा तालुक्यातील मौजे वाळकेवाडी येथे शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी भव्य सत्संग व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा वाळकेश्वर मंदिर, वाळकेवाडी येथे पार पडणार असून सकाळी ७.०० ते १०.०० या वेळेत पालखी सोहळा व सकाळी ११.०० वाजता भव्य सत्संग होणार आहे.

हा कार्यक्रम राष्ट्रसंत श्री १०८ डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुकर यांच्या कृपाशीर्वादाने आयोजित करण्यात आला असून,

गुरुवर्य युवासंत राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज (अहमदपूर)यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

या सत्संग सोहळ्यात

ष.ब्र.प.पु. श्री १०८ युवासंत वेदांताचार्य दिंगबर शिवाचार्य महाराज (वसमतकर)

ष.ब्र.प.पु. श्री १०८ अमृतेश्वर शिवाचार्य महाराज (जिंतूर)

श्री गुरुवर्य आचार्य गुरुराज स्वामी, भक्ती स्थळ अहमदपूर.

यांचा अमृतमय उपदेश भाविक भक्तांना लाभणार आहे.

या कार्यक्रमाला शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच शिवा राष्ट्रीय भूषण पुरस्कारप्राप्त गायक सुरमणी सोमनाथ उर्फ रविराज किडीले (शिरूर-अनंतपाळ) व त्यांचा गायक संच यांचे सुमधुर भक्तिगीतांचे सादरीकरण होणार आहे.

हा कार्यक्रम सलग १२व्या वर्षी आयोजित करण्यात येत असून पंचक्रोशीतील भाविकांसाठी हा एक मोठा आध्यात्मिक सोहळा ठरणार आहे.

तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त गावकरी मंडळी, वाळकेवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात मतदार जन जागृती अभियान संपन्न,आजचा विद्यार्थी उद्याचा सक्षम मतदार व नागरिक असतो–तहसीलदार राकेश गिड्डे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय लोकशाही सक्षम करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपली मतदार नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.लोकशाही प्रक्रियेत विद्यार्थी मतदार हा महत्त्वाचा घटक असुन तो उद्याचा तो सक्षम नागरिक व मतदार असतो असे प्रतिपादन केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केले.ते केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार जनजागृती अभियानाच्या कार्यक्रमात प्रमुखपाहुणे म्हणून बोलत होते.तहसीलदार गिड्डे पुढे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी शिस्त व नियमित अभ्यास करुन यश संपादन करावे. सातत्य हाच प्रगतीचा मार्ग आहे.त्याच बरोबर आपल्या लोकशाहीला अजुन बळकट करण्या साठी सर्वच विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी करुन घ्यावी असे ही




सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माधवराव फावडे हे होते.या कार्यक्रमात व्यासपीठावर अजित ढोपे नगर पंचायत मुख्य कार्यकारी अधिकारी केज सहाय्यक महसुल अधिकारी रोडगे मॅडम, प्राचार्य डॉ.माधवराव फावडे,वसंत कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश धेंडे,उपप्राचार्य हेमंत देशमुख उपस्थित होते.प्रमुख अतिथींचे स्वागत अनुक्रमे प्राचार्य डॉ.फावडे,प्रकाश धेंडे, हेमंत देशमुख,डॉ.सौ. रतन गंगणे,डॉ.टी.एस. बिडवे यांनी केले. याकार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. जे.बी.यादव यांनी सुत्र संचालन डॉ.बी.जे.हिरवे तर आभार डॉ.एस.एम. सरसरे यांनी केले.आभार प्रदर्शनापुर्वी राष्ट्रीय मतदारदिनाच्या निमित्ताने मतदारांच्या शपथेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्विते साठी डॉ.सी.बी.इंगळे, डॉ.एस.के.शिंदे, डॉ.एम. एस.कांबळे,डॉ.एम.एस.माने, डॉ.टी.एस.बिडवे, रासेयो कार्यक्रमअधिकारी डॉ.जे.बी.यादव ,डॉ.एस. एम.सरसरे, डॉ.सौ.आशा बोबडे ,डॉ.सौ.रतन गंगणे, डॉ.बी.एस.थोरात, डॉ. अनिल किर्दंत, डॉ.प्रशांत क्षीरसागर,डॉ.एस.एस. जाधव, डॉ.सुधीर आगळे, डॉ.काळम ,डॉ.काकडे, डॉ. अशोक भोसले,डॉ. संदिपान गायके, प्रा.समुद्रे, प्रा.शेटे,प्रा.लोंढे,प्रा.रोडे, डॉ.प्रकाशखुळे, डॉ.अनिल गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# नंदुरबारच्या विकासासाठी ७ तास 'मॅरेथॉन' मंथन; खा.डॉ.गोवाल पाडवींच्या उपस्थितीत 'दिशा' समितीची आढावा बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आणि केंद्र पुरस्कृत योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने दिनांक दिनांक २० रोजी 'दिशा' (जिल्हा विकास समन्वय आणि संनियंत्रण समिती) समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत खासदार डॉ. गोवाल पाडवी यांनी उपस्थित राहून विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला आणि प्रशासनाला महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

**योजनांचा सखोल आढावा आणि त्रुटींवर बोट:**–सुमारे ७ तास चाललेल्या या प्रदीर्घ बैठकीत केंद्र सरकार पुरस्कृत विविध योजनांच्या अंमलबजावणीवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत प्रामुख्याने रस्ते विकास, आरोग्य सेवा, शिक्षण, आणि घरकुल योजनांच्या सद्यस्थितीची




> **नंदुरबार जिल्ह्याचा विकास ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी हातात हात घालून काम करणे काळाची गरज आहे.**
>
> **–खासदार डॉ.गोवाल पाडवी**

तपासणी करण्यात आली. खासदार पाडवी यांनी अनेक योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि त्रुटींकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. केवळ कागदावर विकास न दिसता, तो प्रत्यक्ष जमिनीवर दिसला पाहिजे, असेही ते म्हणाले.या बैठकीस जिल्ह्यातील आमदार, नगराध्यक्ष, समितीचे सन्माननीय सदस्य आणि सर्वच विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

७ तासांच्या या चर्चेत जनतेच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी समन्वयाने काम करण्याचा निर्धार करण्यात आला.

बैठकीदरम्यान खासदार डॉ. गोवाल पाडवी यांचा सक्रिय सहभाग लक्षणीय ठरला. त्यांनी जिल्ह्यातील दुर्गम भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या मांडल्या आणि केंद्र सरकारचा निधी योग्य ठिकाणी आणि पूर्ण क्षमतेने वापरला जावा, यावर भर दिला. त्यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे आणि आक्रमक भूमिकेमुळे अनेक प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघण्यास मदत होणार आहे.

# तुलसी महाविद्यालयाची विद्यार्थिनी पलक सावंतची देशसेवेसाठी निवड



दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथील बीसीए तृतीय वर्गाची विद्यार्थिनी पलक सूरज सावंत हिची नुकतीच सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) मध्ये निवड झाली असून पहिल्याच प्रयत्नात तिने हे यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. पलक सावंत सध्या बीसीएच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असून पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने देशसेवेचे ध्येय उराशी बाळगून स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत देण्यात येणारे नियमित मार्गदर्शन आणि तिची स्वतःची मेहनत यांच्या जोरावर तिने सीमा सुरक्षा दलाच्या परीक्षेत यश मिळवले.पलकच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तुलसी शैक्षणिक समूहचे संचालक मा.प्रा.प्रदीप रोडे, मुख्याध्यापक मा.राम वाघुंबरे,मा.अतुल मुळे,मा.प्रा.अर्जुन राठोड तसेच प्राचार्य प्रा.डी.जी.निकाळजे यांच्या हस्ते पलकचा प्रेरणादायी पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला आणि तिच्या मेहनत व चिकाटीचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातून यापूर्वीही अनेक विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्य दलात व विविध शासकीय सेवांमध्ये यश मिळवले आहे. पलकच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- मंगल अनंत लोंढे
रा.केज यांना श्री. सात बारा स.न.२६९/४
यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.२६९/४
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं ------ विभाग- लोंढे वस्ती
चर्तु:सिमा
पुर्व :रस्ता
पश्चिम :व्यंकट हजारे
दक्षिण : मंगल लोंढे
उत्तर : नंदकुमार लोंढे
लांबी : द.उ. ४० फूट रुंदी : पू.प. ३० फूट
सात बारा स.न. २६९/४ व शपथपत्र १८३०१ दि.०६/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव :- संदिप नवनाथ नेहरकर
रा.केज यांना श्री. सात बारा स.न.२१२/२
यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.२१२/२
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं---- विभाग-बारभाई गल्ली
चतु:सिमा
पुर्व :संदीप नेहरकर
पश्चिम:संजय नेहरकर
दक्षिण :रस्ता
उत्तर :अशोक म०हाजन
लांबी : द.उ. ४० फूट रुंदी : पू.प. ३० फूट
सात बारा स.न. २१२/२ व शपथपत्र १९११८ दि. २०/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा व शपथपत्रा अधारे
अर्जदाराचे नाव - शामराव रावसाहेब लोंढे
रा.केज यांना श्री. सात बारा स.न.२६७/२
यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
स.न.२६७/२
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं---- विभाग-बोबडे वाडी रोड
चतु:सिमा
पुर्व :रस्ता व शामराव लोंढे
पश्चिम:शामराव गुंड
दक्षिण :कच्चा रस्ता
उत्तर :विठ्ठल भोसले
लांबी : द.उ. ४० फूट रुंदी : पू.प. ३० फूट
सातबारा स.न. २६७/२ व शपथपत्र ९३५४ दि. १/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा आधारे
अर्जदाराचे नाव :- गोविंद नवनाथ नेहरकर
रा.केज यांना श्री. सात बारा स.न.२१२/२
यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.२१२/२
वार्ड क्रं---- विभाग- बारभाई गल्ली
चतु:सिमा
पुर्व :संदीप नेहरकर
पश्चिम:जालिंदर नेहरकर
दक्षिण : रस्ता
उत्तर :श्रीराम चौरे
लांबी : पु.प. ३० फूट रुंदी : द.उ. ४० फूट
सातबारा नोटरी शपथपत्र १९३१७ दि. २०/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा आधारे
अर्जदाराचे नाव :- मनीषा सुरेश लोंढे
रा.केज यांना श्री. सात बारा सर्वे.न.४९८
यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.४९८
वार्ड क्रं १४ विभाग-बोबडे वाडी रोड
चतु:सिमा
पुर्व :रस्ता
पश्चिम:शिल्लक जागा
दक्षिण : परिमाळा लक्ष्मण लोंढे
उत्तर :रंजना लोंढे
लांबी : पु.प. ३३ फूट रुंदी : द.उ. ३३ फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र ५२२२ दि. १२/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

## प्रसिद्धी पत्रक

**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .२२/०१/२०२६
सातबारा अधारे
अर्जदाराचे नाव :- जयश्री नवनाथ नेहरकर
रा.केज यांना श्री. सात बारा सर्वे.न.२१२/२
यांचे कडुन खालील
चतु:सिमेच्या आतील
सर्वे.न.२१२/२
वार्ड क्रं २ विभाग-धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व :संजय नवनाथ नेहरकर
पश्चिम:दत्तू श्रीरंग डापकर
दक्षिण :लाईट सप्टेशन ऐरिया
उत्तर :रस्ता
लांबी : पु.प. ५० फूट रुंदी : द.उ. ४३ फूट
सातबारा नोटरी शपथ पत्र १९३१६ दि. २०/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

# कल्याण-मुंबई मटक्यावाल्या गणेश खराडेला कायद्याचा आकडा!

## मटका किंग गणेश खराडेची संघटित गुन्हेगारी कायद्या अंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

### आता पुढचा नंबर कुणाचा? या धास्तीने गुन्हेगारांच्या डोळ्यापुढे दिवसा चाँद सितारे चमकणार!

### अनेकांच्या डोळ्यापुढे 'चाँद-सितारे' चमकणार



**आता पुढचा नंबर कुणाचा?**

**गणेश खराडे यांच्यावर केलेल्या कारवाईमुळे आता अनेकांच्या डोळ्यापुढे भर दिवसा ' चाँद सितारे' चमकू लागले आहेत. त्यामुळे आता पुढचा नंबर कुणाचा याची केज शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.**

**ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस हवालदार संतोष गित्ते शेलार, पठाण, जोगदंड, घोडके, अभिमन्यु औताडे, बिबीषण चव्हाण यांनी केली.**

**उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारी आणि अवैध्य धंदे यांच्या विरुद्ध पाश आवळायला सुरुवात केली आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी केज येथील मटका किंग गणेश खराडे याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून त्याची रवानगी हर्सूल कारागृहात केली अशी. आता पुढचा नंबर कुणाचा ? या धास्तीने अनेकांच्या डोळ्यापुढे दिवसा ' चाँद–सितारे' चमकू लागले आहेत. तर संघटित गुन्हेगारी आणि अवैध्य धंदेवाले धास्तावले आहेत.उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी सराईत गुन्हेगारांवर कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी एम पीडी डी ए आणि मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्याच्या संकल्प केला आहे.**

दैनिक वादळ वार्ता

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यात कल्याण मुंबई नावाचा मटका चालविणारा मटाकाकिंग गणेश सुधीर खराडे वय (३५ वर्षे) (रा. टेलरगल्ली, केज) यांचे विरुध्द एम पी डी ए कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्या बाबतचा प्रस्ताव जिल्हा पोलीस अधीक्षक, नवनीत काँवत यांच्या मार्फत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना सादर केला होता.

गणेश खराडे याच्या विरुद्ध केज येथे कल्याण व मिलन मटका खेळणे व खेळवीणे. तसेच एक रुपयाचे ९० रुपये देण्याचे अमिष दाखवुन बेकायदेशीररित्या मटका जुगार चालविणे व साक्षीदारांना धमक्या देणे. शिवीगाळ करणे. अशा स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्याने त्याचे वर्तन सुधारावे या करीता त्याचेवर भा न्या सं १२९ अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती. तरीसुध्दा त्याने त्याचे वर्तणात सुधारना केली नाही. त्याच्या विरुद्ध केज येथे एकुण १० गुन्हे दाखल असुन त्यापैकी ६ न्यायप्रविष्ठ व ४ गुन्हे तपासावर आहेत.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दि. २२ जानेवारी रोजी त्याचा एम पी डी ए अंतर्गत आदेश पारीत करून त्याला तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्या नंतर केज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे आणि स्थानिक गुन्हे शाखा यांना त्याला ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. सदर आदेशा वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड व उपनिरीक्षक महेश विघ्ने यांनी गोपनीय माहीतीच्या आधारे गणेश खराडे याला दि. २२ रोजी केज शहरातुन ताब्यात घेतले. त्याला केज पोलिस ठाण्यात हजर केले. त्या नंतर पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी पोलिस कर्मचाऱ्या मार्फत गणेश खराडे याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल कारागृहात केली आहे.

## सातपुड्यात वीजपुरवठ्याला बळकटी; देवमोगरा पुनर्वसन व गमन येथे ३३ के.व्ही.उपकेंद्रांचे भूमिपूजन

दैनिक वादळ वार्ता

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील वाढत्या विजभारामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी दूर होऊन तालुक्यातील सर्व गावांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी देवमोगरा पुनर्वसन व गमन येथे नव्याने ३३ के.व्ही. वीज उपकेंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. या दोन्ही उपकेंद्रांचे भूमिपूजन अक्कलकुवा-अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांच्या हस्ते संपन्न झाले.




सातपुडा पर्वतरांगांतील अतिदुर्गम भागातील नागरिकांना अखंड वीज सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने आमदार आमश्या पाडवी यांनी गमन येथे नव्या ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी विशेष प्रयत्न केले होते. या उपकेंद्रांमुळे विजभार कमी होऊन घरगुती, कृषी तसेच व्यापारी वीजपुरवठा अधिक सुरळीत होणार आहे.

या कार्यक्रमास माजी समाजकल्याण सभापती शंकर पाडवी, प्रा. डॉ. दिनेश खरात, धिरसिंग पाडवी, सरपंच दिनेश वसावे, पुण्या वसावे, सरपंच विकी पाडवी, चेतन पाडवी, हरिश्चंद्र तडवी, नुरजी वसावे, लालसिंग वसावे, सरपंच डोंगी लालसिंग वसावे उपस्थित होते. तसेच महावितरणचे सहा. कार्यकारी अभियंता दिनेश पाडवी, धडगावचे उपअभियंता जगदीश पावरा यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्या उपकेंद्रांमुळे सातपुड्यातील दुर्गम भागाच्या विकासाला चालना मिळणार असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## आजच्या युवक-युवतींनी शिक्षण निरंतर घ्यावे-प्राचार्य डॉ.हरिदास फेरे

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




माऊली विद्यापीठ संचलित सरस्वती महाविद्यालय, केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळेचे आयोजन दिनांक २१ जानेवारी रोजी करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी येथील माजी प्राचार्य प्रो. डॉ. हरिदास फेरे यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शन करताना डॉ. फेरे म्हणाले की, आजीवन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सतत ज्ञान व कौशल्य आत्मसात केले पाहिजे. बदलत्या काळात केवळ औपचारिक शिक्षण पुरेसे नसून, जीवनभर शिकण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. आजच्या युवक-युवतींनी शिक्षण निरंतर घेतले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात एलआयसी कॉर्पोरेट क्लब बीडचे सदस्य जाधव राजेश उत्तम व जनविकास महाविद्यालय, बनसारोळा येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजेश गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. बी. पाटील होते. त्यांनी आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास व सामाजिक जाणीव विकसित करणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. अर्चना वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. किरणकुमार धिमधिमे यांनी तर आभार डॉ. अशोक घोडके यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेड येथे होणाऱ्या हिंद -दी-चादर कार्यक्रमास बंजारा समाजासह सर्व जनतेनी उपस्थित राहावे-दिलीप दादा जाधव

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

शिख धर्माचे ९ वे गुरू गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० वा शहीदी समागम निमित्त नांदेड येथे होणाऱ्या हिंद -दी-चादर कार्यक्रमास लोहा तालुक्यातील बंजारा समाजासह सर्व हिंदू समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन लोहा तालुक्यातील बंजारा समाजाचे नेते तथा सावरगाव न. ग्राम पंचायतीचे माजी सरपंच तथा हिंद -दी-चादर समितीचे अशासकीय सदस्य दिलीप दादा जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना केले आहे.



यावेळी सामाजिक कार्यकर्ते मनिष जाधव, नितीन जाधव,संजय जाधव, विजयकुमार पवार, अशोक जाधव, देविदास जाधव, अरविंद नेवळे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे दिलीप दादा जाधव यांनी असे नमूद केले की, शिख धर्माचे ९ वे गुरू तेग बहादूर यांचा शहिदी दिवस आपल्या भारत देशाच्या इतिहासात धर्म आणि मानवता यांची रक्षा चे प्रतीक म्हणून साजरा केला जातो . गुरु तेग बहादूर हे शिख धर्माचे ९ वे गुरू होते . त्यांना धर्म की चादर म्हटले जाते.१६७५ मध्ये मुगल सम्राट औरंगजेब यांनी हिंदू लोकांना इस्लाम धर्म स्वीकारण्यास बाध्य केले होते . तेव्हा गुरू तेग बहादूर साहिब यांनी प्राणाची आहुती दिली. त्यांनी दिल्ली येथील चांदनी चौकात शहिदपण स्विकारुन धार्मिक स्वंतत्र्याचा संदेश दिला. त्यांचे शाहिदपण हे शिख धर्मापुरतेच नव्हते तर समस्त मानवतेला प्रेरणा देणारे होते. त्यांच्या बलिदानाची भावना आपल्याला शिकवण देते की धर्म सत्य आणि न्यायासाठी आपले जीवन बलिदान देणे सर्वोच्च आहे .शासनाच्या वतीने गुरू तेग बहादूर साहिब यांच्या ३५० वा शहीद समागम निमित्त नांदेड येथील मोदी ग्राउंडवर दि.२४ व २५ जानेवारी रोजी हिंद -दी-चादर कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. सदरील कार्यक्रमास लोहा तालुक्यातील सर्व बंजारा समाज बांधवासहीत सर्व हिंदू समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन लोहा तालुक्यातील बंजारा समाजाचे नेते तथा सावरगाव न. चे माजी सरपंच हिंद की चादर समितीचे अशासकीय सदस्य दिलीप दादा जाधव यांनी केले आहे.

## कढेलच्या ग्रामस्थांचा माणुसकीचा 'ट्रॅक'; जिल्हा परिषद शाळेतील ७३ विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार!



**कढेल ग्रामपंचायतीने आणि गावकऱ्यांनी केवळ कपड्यांचे वाटप केले नसून, मुलांच्या पंखांना नवे बळ दिले आहे. गावकरी जर असेच पाठीशी उभे राहिले, तर जिल्हा परिषद शाळेतील मुले नक्कीच यशाची शिखरे सर करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.**

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

गाव करी ते राव काय करी या म्हणीचा प्रत्यय पुन्हा एकदा तळोदा तालुक्यातील कढेल गावाने दिला आहे. केवळ शासनाच्या मदतीची वाट न पाहता, आपल्या गावातील मुलांचे भविष्य उज्वल व्हावे आणि त्यांच्या आरोग्याचा दर्जा सुधारावा, या उदात्त हेतूने ग्रुप ग्रामपंचायत कढेल यांनी जिल्हा परिषद शाळेतील ७३ चिमुकल्यांना ट्रॅकसूटचे वाटप केले आहे. गावकरी आणि लोकप्रतिनिधींच्या या सक्रिय पुढाकारामुळे संपूर्ण तालुक्यात कढेल पॅटर्नचे कौतुक होत आहे.

ग्रामीण भागातील मुलांमध्ये गुणवत्ता ठासून भरलेली असते, मात्र अनेकदा साहित्याअभावी त्यांना संधी मिळत नाही. हीच उणीव ओळखून सरपंच अश्विनी संजय वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने इयत्ता पहिली ते पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार ट्रॅकसूट देण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमामुळे शाळेतील मुलांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास पाहायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सरपंच अश्विनी वळवी यांनी सांगितले की, आमची मुले केवळ पुस्तकी ज्ञानातच नव्हे, तर मैदानावरही चमकलीपाहिजेत. यावेळी ग्रामसेवक किसन पावरा, ग्रामपंचायत सदस्य अमृत मोवाशी, संतोष ठाकरे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोग्या मोवाशी यांनीही मुलांशी संवाद साधून त्यांना स्वच्छतेचे आणि व्यायामाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे, तर गावातील शिक्षणतज्ञ आणि पालकांनीही या उपक्रमाला मनापासून पाठिंबा दिला. ट्रॅकसूटमुळे मुलांमध्ये शिस्त आणि खेळाप्रती ओढ निर्माण झाली आहे. गणवेशासोबतच आता खेळाचा स्वतंत्र पोषाख मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले आहे. या यशस्वी उपक्रमासाठी अनिल वळवी, सुनील मोलवी, छाया वळवी, गणेश ठाकरे आणि शिक्षिका अर्चना वळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापिका राजश्री पाटील यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करत गावकऱ्यांच्या या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077